कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/हिंसंवि/२०२६–२७/१२४
दि. २१/०७/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कलाअकादमी गोवा, हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग आयोजित बासरी वादन कार्यशाळा दिनांक १७ व १८ जुलै २०२६ रोजी कृष्ण कक्ष येथे संपन्न झाली. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बासरीवादक सूरमणी पं राजेंद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शना खाली सदर कार्यशाळा संपन्न झाली. १६ जुलै रोजी सकाळी १० वा. सदस्य सचिव शंकर गावकर, प्रशासकीय संचालिका नेतल आमोणकर, पं राजेंद्र कुलकर्णी, हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाच्या संचालिका डॉ सपना नाईक, संगीत व नृत्य विभागातील अध्यापक वर्ग यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. पं राजेंद्र कुलकर्णी यां सारख्या गुरुंच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन होत आहे याबद्दल श्रीशंकर गावकर यांनी आनंद व्यक्त केला. संगीत व नृत्य विभागात बासरीचे शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून उत्तम प्रशिक्षण घ्यावे असे श्री गावंकर आपल्या मनोगत पर भाषणात म्हणाले. पं.राजेंद्र कुलकर्णी यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ सपना नाईक यांनी स्वागत व प्रास्ताविक तर सुत्रसंचालन श्री सचिन तेली यांनी केले.

पं. पन्नालाल घोष यांच्या पासून सुरु झालेली बासरी वादनाची भारतातील परंपरा व त्यात पं. हरिप्रसाद चौरासिया यांसारख्या कलाकारांनी दिलेलं योगदान याविषयी पं.कुलकर्णी यांनी कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना माहिती दिली. वादनातील विविध बारकावे व तंत्र याविषयी मौलिक मार्गदर्शन केले .विविध रागातील गती शिकवून विद्यार्थ्यांकडून सादर करून घेतल्या . समारोपापूर्वी पं.राजेंद्र कुलकर्णी यांच्या बासरीवादनाच्या स्वतंत्र मैफिलीचा आस्वाद घेता आला. त्यांनी राग बागेश्री सादर केला. त्यांचेच शिष्य श्री सोनिक वेलींगकर व श्री रोहित वनकर यांनी बासरी संगत व श्री भार्गवराम गर्दे यांनी तबला साथसंगत केली.

दोन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेची सांगता शनिवार दिनांक १८ जुलै रोजी संध्याकाळीसंपन्न झाली. कला अकादमीचे उपाध्यक्ष श्री प्रविण गावकर यांच्याहस्ते कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी उपाध्यक्ष श्री प्रविण गांवकर यांनी आपले मौलिक विचार प्रगट केले व सदर कार्यशाळा आयोजित केली याबद्दल हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाचे विशेष अभिनंदन केले. संगीत व नृत्य विभागातील बासरीचे अध्यापक श्रीरोहित वनकर यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. समारोपाच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ वरदा बेडेकर यांनी केले. एकूण ४० विद्यार्थी सदर कार्यशाळेत सहभागी झाले होते .

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)